संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित

# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय

परतवाडा, ता. अचलपूर जि. अमरावती (महाराष्ट्र) -४४४८०५

नॅक द्वारा ‘अ’ श्रेणी प्राप्त

# राष्ट्रीय सेवा योजना

## सत्र २०२३-२४



# नियमित कार्यक्रम अहवाल

| प्रा. अंकुश तुरखडे | डॉ. एकनाथ तट्टे | प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे |
|---|---|---|
| (कार्यक्रम अधिकारी) | (प्रभारी प्राचार्य) | (महिला कार्यक्रम अधिकारी) |

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम अहवाल

# सत्र २०२३-२०२४

शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १९ जुलै २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली. या सल्लागार समितीचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे आहेत. समाजसेवेचा पिंड असलेले दोन प्राध्यापक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे, शासनाच्या विकास विभागाचे एक उच्च पदस्थ अधिकारी म्हणून अचलपूर पंचायत समितीचे बीडीओ श्री. सुधीर अरबट, दत्तकग्राम जैतादेहीचे सरपंच श्री सचिन दहीकर, रासेयो पथकातील विद्यार्थी प्रतिनिधी रजत इंगोले व पौर्णिमा ढेमरे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे यांची सदस्य म्हणून तर अधिकारपरत्वे सचिव म्हणून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे हे आहेत. सत्र २०२३-२०२४ मध्ये रासेयो पथकाच्या वतीने खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने १ ऑगस्ट २०२३ रोजी थोर समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महविद्यालयाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. रवींद्र खंडेराव यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन केले व लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली सविस्तर अशी माहिती दिली. तसेच दुसरे प्रमुखवक्ते डॉ. प्रमोद गारोडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक व साहित्य कार्याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नरेश बुराडे यांनी केले. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व महाविद्यालायातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### राष्ट्रीय सेवा योजना द्वितीय उद्बोधन वर्ग संपन्न.

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता उद्बोधन वर्गाचे आयोजन दिनांक ५ ऑगस्ट २०२३ रोजी ठीक सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. या उद्बोधन वर्गाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे व या उद्बोधन वर्गाच्या अध्यक्षस्थानी प्रा सतीश भागवत होते. या उद्बोधन वर्गाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा अंकुश तुरखडे यांनी केले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्तविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा अंकुश तुरखडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा नरेश बुरडे, प्रमोद मेटकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाविद्यालयात पंचप्रण शपथ कार्यक्रम आयोजन

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ९ ऑगस्ट २०२३ रोजी 'मेरी माटी मेरा देश' या अभियाना अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पंचप्रण शपथ व वीरोको

वंदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झालेली आहेत व या स्वातंत्र्य प्राप्ती साठी अनेक महान वीरांनी आपले प्राण अर्पण केले आहेत. त्या शूर वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संपूर्ण देशामध्ये 9 ऑगस्ट 2023 ते 15 ऑगस्ट 2023 दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन या अंतर्गत करण्यात येणार आहे. महाविद्यालायातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने 9 ऑगस्ट 2023 रोजी पंचप्रण शपथ कार्यक्रमाचे आयोजन ठीक सकाळी १० वाजता महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. शारीरिक शिक्षण विभाग संचालक प्रा. सतीश भागवत यांनी महाविद्यालयातील उपस्थित सर्व प्रमुख अतिथी, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांना पंचप्रण शपथ दिली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अंकुश तुरखडे यांनी केले होते. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व महाविद्यालायातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित**

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दिनांक 10 ऑगस्ट 2023 रोजी 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन ठीक सकाळी ११ वाजता महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते . त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये वृक्षारोपण याचे महत्त्व व महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या औषधी वनस्पती ची लागवड करण्यात आली आहे त्याचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे यांनी केलेले होते. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला व या वनस्पतींचे महत्त्व त्यांनी समजून घेतले या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा सतीश भागवत, डॉ.प्रफुल कडू, प्रा नरेश बुराडे, प्रा. मासोदकर, प्रा भिंगारे, प्रा वानखडे, डॉ. वैष्णव, प्रा. सुमित घोगे, श्री प्रमोद मेटकर इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वीरोको वंदन कार्यक्रमाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दिनांक 11 ऑगस्ट 2023 रोजी 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमा अंतर्गत वीरोको वंदन कार्यक्रमाचे आयोजन ठीक सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. वीरोका वंदन कार्यक्रमा अंतर्गत महविद्यालया मध्ये विविध वीरांना नमन करण्यात आले. यावेळी महाविद्यालय मध्ये पियुष गजानन वानखडे या देश सेवेत कार्यरत जवानाचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे यांनी केले. या कार्यक्रमाकरिता

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व महाविद्यालायातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**स्वच्छता अभियान**

दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान अभियान राबविण्यात आले होते. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालालायाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

**राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब च्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन कार्यक्रम संपन्न**

दिनांक १२ ऑगस्ट 2023 रोजी ठीक सकाळी ११ वाजता राष्ट्रीय सेवा योजना पथक व रेड रिबन क्लब ICTC केंद्र व उपजिल्हा रुग्णालय अचलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिना निमित्य युवकांन मध्ये आरोग्य जनजागृती व आरोग्य मंत्री तानाजी सावंत याच्या फेसबुक लाईव्ह कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रवीण पिंजरकर समुपदेशक उपजिल्हा रुग्णालय अचलपूर व प्रा. रवींद्र खंडेराव हे होते. त्यानंतर महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री यांचा फेसबुक लाईव्ह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या फेसबुक लाईव्ह मार्गदर्शनाचे सादरीकरण प्रोजेक्टर च्या साह्याने विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले व राष्ट्रीय स्वयंसेवकांच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण महाविद्यालयामध्य पाहता आले. या कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा अंकुश तुरखडे यांनी केले व या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. नरेश बुराडे यांनी केले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

**13 ऑगस्ट ते १५ दरम्यान हर घर तिरंगा अभियान**

बी एस पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे शासनाच्या आदेशानुसार "हर घर तिरंगा" अभियान दि १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान राबविण्यात आले व त्या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अभियानाची सुरुवातीला जनजागृती करण्यात आली, आपल्या घरावर झेंडा लावताना कोणती काळजी घ्यावी, झेंडा लावण्याचे नियम त्यांना समजावून सांगण्यात आले. स्वातंत्राच्या अमृत महोत्सवी वर्षा महाविद्यालयात साजरे करण्यात येत होते. दि १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट च्या दरम्यान महाविद्यालयात तिन्ही दिवस झेंडा वंदन व १५ ऑगस्टला समूह राष्ट्रगानचे आयोजीत करण्यात आलेले होते.

**प्लास्टिक निर्मुलन अभियान**

दिनांक १९ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने प्लास्टिक निर्मुलन अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर प्लास्टिक मुक्त केला. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या प्लास्टिक अभियानात महाविद्यालायातील सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

**प्राचार्य कै. व्ही. एम. कुळकर्णी पुण्यतिथी**

दिनांक २० ऑगस्ट २०२३ रोजी ठीक सकाळी ९.४५ वा. राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने प्राचार्य कै. व्ही. एम. कुळकर्णी यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे यांनी प्राचार्य कै. व्ही. एम. कुळकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सर्किट हाउस परतवाडा येथे मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन**

युवा दिनानिमित्त परतवाडा शहरातील ऑटो ड्रायव्हर यांच्यासाठी विशेष जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कार्यालय, डी.एस.आर.सी., जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती, पोलीस स्टेशन परतवाडा, आयसीटीसी उपजिल्हा रुग्णालय अचलपूर, अनंत लेप्रोस्कोपी अँड कॅन्सर हॉस्पिटल, रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना पथक भगवंतराव शिवाजी पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 29 ऑगस्ट 2023 रोजी सकाळी १० ते २ या दरम्यान सर्किट हाऊस परतवाडा येथे मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन आयोजित करण्यात आले होते. सर्वात प्रथम या शिबिराचे उद्धाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत बोरसे पीएसआय वाहतूक शाखा परतवाडा, प्रमुख मार्गदर्शक श्री अजय साखरे सर जिल्हा कार्यक्रम अधिकारी अमरावती, डॉ. क्रांती शिलेदार सर वैद्यकीय अधीक्षक अचलपूर, मनोहरलाल गिडवानी गीतांजली ड्रेसेसचे संचालक, डॉ. ढोले सर अचलपूर , प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, अल्का चोरे मॅडम LAB टेक्निशियन हे होते.

NCD चमू व HLC चमू यांनी सर्व ऑटो रिक्षा चालक यांची तपासणी केली. या शिबिराचा लाभ ऑटो रिक्षा चालक मोठ्या प्रमाणत घेतला. या कार्यक्रमांमध्ये भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन आरोग्य व रक्त तपासणी शिबिरा मध्ये मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. यामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. श्रीकांत शेटे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री अमोल मोरे यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये आयोजनामध्ये श्री. संदीप चव्हाण ठाणेदार परतवाडा, श्रीकांत शेटे आयसीटीसी कौन्सिलर अचलपूर, प्रवीण पिंजरकर आयसीटीसी कौन्सिलर, प्रमोद मिसाळ तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथक, तसेच इतर मान्यवर यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले.

**औषधी वनस्पती  वृक्षांची देखभाल व संवर्धन कार्यक्रम**

महाविद्यालयाच्या परिसरामध्ये नवीन लागवड केलेल्या औषधी वनस्पतींची देखभाल व संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 26 ऑगस्ट 2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे  हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात औषधी वनस्पतींची योग्य वाढ व्हावी यासाठी त्यांची झाडांची उखरी, गवत खुरपणी, व पाणी देणे यासाठी भरपूर असे प्रयत्न केले. यावेळी स्वयंसेवकांना  औषधी वनस्पतींचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या औषधी वनस्पती  वृक्षांची देखभाल व संवर्धन कार्यक्रमात महाविद्यालायातील  सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

**स्वच्छता अभियान**

दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर गांजर गवतमुक्त केला. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या स्वच्छता अभियानात महाविद्यालायातील  सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

**महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 5 सप्टेंबर 2023 रोजी ठीक सकाळी १० वाजता शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते तर प्रमुख वक्ते प्रा. सतीश भागवत हे होते. दरवर्षी 5 सप्टेंबर या दिवशी शिक्षक दिन साजरा केला जातो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने शिक्षकांप्रती सन्मान प्रकट करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. प्रमुखवक्ते प्रा. सतीश भागवत यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व समजून दिले व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांचे समाजातील असलेले स्थान व ते करत असलेले कार्य याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे संचालन  प्रा.  अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वच्छता अभियान**

दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी

प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या स्वच्छता अभियानात महाविद्यालायातील सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

**मेरी माटी मेरा देश अभियाना अंतर्गत अमृत कलश संकलन कार्यक्रम**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'मेरी माटी मेरा देश' अभियाना अंतर्गत अमृत कलश संकलन कार्यक्रमाचे आयोजन १३ सप्टेंबर २०२३ रोजी ठीक सकाळी १० वाजता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

भारत सरकार व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'मेरी माटी मेरा देश' या अभियानांतर्गत अमृत कलश मध्ये भारतातील विविध भागातील माती गोळा करणे व भारताच्या शूर वीरांना वंदन करणे या अभियान अंतर्गत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या गावा-गावां मधून एक मुठी माती आणून त्याचे संकलन अमृत कलश मध्ये केलेले होते. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे यांनी सर्वप्रथम अमृत कलश मध्ये एक मुठी माती टाकून प्रारंभ केला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून श्री निकेश बोंडे हे उपस्थित होते. व त्यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रत्येकाने या अमृत कलश मध्ये एक मुठी माती टाकून या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी यांनी केलेले होते.

**कै. माधवराव भगवंतराव पाटील पुण्यतिथी**

दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने कै. माधवराव भगवंतराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे यांनी प्राचार्य कै. व्ही. एम. कुळकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २५ सप्टेंबर 2023 रोजी ठीक सकाळी ११ वाजता राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून श्री. देवेंद्र दिहाडे व्यवस्थापक बेंचमार्क गारमेंट तोंगलापूर फाटा, मासोद व प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. रवींद्र खंडेराव हे होते व डॉ दयाश्री कोकाटे महिला कार्यक्रम अधिकारी हे होते.

श्री. देवेंद्र बिहाडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेद्वारे राष्ट्र उभारणीत सहभागी होण्याची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना 24 सप्टेंबर 1969 ला करण्यात आली, असे मत व्यक्त करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी आचल धंदर व कशीश गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन रजत इंगोले यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. शेळके, प्रा. बुराडे, प्रा.माकोडे, प्रा. सोळंके, प्रा. थोरात, प्रा. भिंगारे, प्रा. नवरे, प्रा. निंभोरकर हे होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वच्छताही सेवा अभियान**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १ ऑक्टोबर 2023 रोजी ठीक सकाळी १० वाजता 'स्वच्छताही सेवा' हा उपक्रम राबविण्यात आला. प्रधानमंत्री यांनी केलेल्या आव्हानानुसार सकाळी १० वाजता पासून १ तास 'स्वच्छताही सेवा' या अंतर्गत महाविद्यालयामध्ये व महाविद्यालासमोरील परिसर येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने श्रमदान करण्यात आले. या श्रमदान कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे यांच्या मागदर्शनाखाली करण्यात आली. महाविद्यालायाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी महाविद्यालायतील परिसरामध्ये श्रमदान करून सर्व परिसर स्वच्छ केला. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांना आपआपल्या घरा समोरील परिसर स्वच्छ करण्याचे व लोकांना या उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आव्हान करण्यात आहे.

**महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २ ऑक्टोबर 2023 रोजी ठीक सकाळी ९ वाजता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे स्थान व त्यांनी केलेले कार्य याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'महात्मा गांधीजींचे जीवन कार्य' विषयावर वकृत्व स्पर्ध्येचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजना वतीने दिनांक ६ ऑक्टोबर 2023 रोजी ठीक सकाळी १० वाजता 'महात्मा गांधीजींचे जीवन कार्य' या विषयावर वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. पी.पी. भाजीखाये हे होते. महाविद्यालयातील स्पर्धकांनी या स्पर्धे मध्ये मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

या स्पर्ध्येचे परिक्षक म्हणून प्रा. रवींद्र खंडेराव व प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे यांनी काम पाहिले व तीन स्पर्धकांची निवड त्यांच्या वकृत्व गुणांच्या आधारे केली. ज्यामध्ये प्रथम क्रमांक कु. एकता मुकुंद दोडके बी.ए. भाग २ हिला मिळाला. द्वितीय क्रमांक कु. पुनम राम दाभाडे वर्ग बी.ए.भाग २ हिला मिळाला. तर तृतीय क्रमांक भवेंद्र रामदास जाधव बी.ए. भाग ३ याला मिळाला. विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार अध्यक्ष यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दयाश्री कोकाटे महिला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. शारदा निंभोकर यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, प्रा. सोळंके, प्रा. मासोदकर, प्रा. नवरे उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वच्छता अभियान**

दिनांक ७ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे खेळाचे मैदान स्वच्छ केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या स्वच्छता अभियानात महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले**.**

**दत्तक ग्राम जैतादेही येथील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १२ ऑक्टोबर २०२३ रोजी रोजी ठीक दुपारी ०१.०० वाजता दत्तक ग्राम जैतादेही येथे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हे सर्वेक्षण प्रा. अंकुश तुरखडे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या सर्वेक्षण मुळे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दत्तक ग्राम जैतादेही येथील सामाजिक व आर्थिक समस्या समजण्यास मदत झाली व समाजातील ह्या समस्या दूर करण्यासाठी कशा प्रकारे मदत करता येईल याबद्दल सर्वांचे मत जाणून घेता आले. गावातील लोकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, व्यवसाय / नोकरी, वार्षिक उत्पन्न, पाण्याची व्यवस्था, घराचे स्वरूप, विजेची सोय, कौटुंबिक माहितीचे विवरण, स्थिती कशा प्रकारची आहे याबद्दल माहिती झाली. गावातील अशा अनेक बाबी बदल माहिती मोठ्या प्रमाणत प्राप्त झाली.

**स्वच्छता अभियान**

दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर व महाविद्यालयासमोरील रस्ता स्वच्छ केले. यावेळी रासेयो

कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ दयाश्री कोकाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या स्वच्छता अभियानात महाविद्यालायातील सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

**शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य जयंती वर्षानिमित्य व्याख्यानाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २७ ऑक्टोबर 2023 रोजी ठीक सकाळी १२ वाजता शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य जन्मशताब्दी निमित्य व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. पी.पी. भाजीखाये हे होते. या कार्यक्रमाला प्रमुखवक्ते म्हणून प्रा. डॉ. मिलिंद तायडे जगदंब महाविद्यालय अचलपूर हे होते. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्याबद्दल सविस्तर असे विचार मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूनम दाभाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा डॉ. दयाश्री कोकाटे महिला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, प्रा. रवींद्र खंडेराव उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राष्ट्रीय एकता दिवस**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २७ ऑक्टोबर 2023 रोजी ठीक सकाळी १०.०० वाजता राष्ट्रीय एकता दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे हे होते. तर प्रमुखवक्ते प्रा. नरेश बुराडे हे होते. प्रमुख उपस्थित म्हणून रासेयो कार्यक्रम अधिकारी अंकुश तुरखडे व डॉ दयाश्री कोकाटे हे होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना सर्वात प्रथम राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली व नंतर प्रा. नरेश बुराडे यानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्राचार्य कै. अण्णासाहेब वैद्य यांची पुण्यतिथी साजरी**

दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने प्राचार्य कै. अण्णासाहेब वैद्य यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे यांनी प्राचार्य कै. अण्णासाहेब वैद्य यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी**

दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे पी. भाजीखाये व प्रा. अंकुश तुरखडे यांनी

महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते**.**

**एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब अचलपूर यांच्या वतीने दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी ठीक सकाळी ११.३० वाजता जागतिक एड्स दिनानिमित्य '**एड्स विषयी जनजागृती '** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. पी.पी. भाजीखाये हे होते. या कार्यक्रमाला प्रमुखअतिथी म्हणून श्री. श्रीकांत शेटे, ICTC समुपदेशक उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर हे होते. त्यांनी एड्स रोगाविषयी प्रसाराची कारणे व रोगाचा प्रसार होऊ नये याविषयी सविस्तर असे विचार मांडले.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. प्रमोद गारोडे व प्रा. सुनील खांडेकर, प्रा. सतीश भागवत हे होते. प्रमुख अतिथी यांनी एड्स रोगाविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी व एड्स विषयी असलेले गैरसमज दूर करण्यास मदत करण्याचे आवाहन केले. तसेच महाविद्यालयाच्या नोटीस बोर्ड वर एड्स संबंधित माहितीचे प्रदर्शन करण्यात आले ज्यामुळे विद्यार्थ्यांना एड्सशी संबंधित माहिती समुदाया पर्यंत पोहचवण्याचे व जनजागृती करण्याचे मदत झाली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुमित घोगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा डॉ. दयाश्री कोकाटे महिला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. नरेश बुराडे, प्रा. जीवन सोळंके उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महापरिनिर्वाण दिन**

दिनांक ०६ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते**.**

**गाडगे महाराज पुण्यतिथी निमित्य कार्यक्रमाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी ठीक सकाळी १० वाजता गाडगे महाराज पुण्यतिथी निमित्य संत गाडगे बाबांच्या दशसुत्रीवर आधारित उदबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. प्रमुख वक्ते प्रा. रवींद्र खंडेराव यांचे संत गाडगे बाबांच्या दशसुत्रीवर आधारित उदबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात

आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संत गाडगे बाबा यांच्या जीवनावर आधारित सर्व माहिती दिली. गाडगे बाबांचे सर्व सामजिक कार्य व सामन्य लोकांनसाठी त्यांनी केलेले सामाजिक कार्य विषयी विस्तृत माहिती दिली. संत गाडगे बाबांच्या दशसुत्रीवर आधारित उदबोधन वर त्यांनी विशेष असा भर दिला. जीवन जगत असतांना या दशसुत्री चा उपयोग करावा असे विचार त्यानी मांडले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा डॉ. दयाश्री कोकाटे महिला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती कार्यक्रम**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २७ डिसेंबर २०२३ रोजी ठीक सकाळी १० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे हे होते. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Salve अंतर्गत मुलांना स्वच्छता विषयी मार्गदर्शन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २७ डिसेंबर २०२३ रोजी ठीक सकाळी १० वाजता झोपडपट्टी मधील मुलांना स्वच्छता विषयी मार्गदर्शन करण्यात आले. या मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी मोठ्या प्रमाणत सहभाग घेतला होता.

**सावित्रीबाई फुले यांची जयंती कार्यक्रम**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी ठीक सकाळी १० वाजता सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे हे होते. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कै. बी.एस. कुळकर्णी यांचा स्मृतिदिन कार्यक्रम**

दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने ठीक सकाळी १०.०० वा. कै. बी.एस. कुळकर्णी यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे यांनी कै. बी.एस. कुळकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच

महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी ठीक सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, प्रा. सतीश भागवत हे होते. तर प्रमुख उपस्थित म्हणून प्रा. डॉ. रुपेश बाजपेयी हे होते. सर्वात प्रथम कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्य त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. सूत्रसंचालन भावेंद्र जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. दयाश्री कोकाटे, प्रा. नवरे, प्रा. निंभोरकर , प्रा. तुरखडे, प्रा. वानखडे, प्रा. वैष्णव, प्रा. मासोदकर, प्रा. पाखरे, प्रा. ठाकरे, महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राष्ट्रीय मतदार दिन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी ठीक सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रमोद गारोडे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. राकेश अथोटे, जगदंब महाविद्यालय, अचलपूर हे होते. तर प्रमुख उपस्थित म्हणून प्रा. अंकुश तुरखडे व प्रा बबलू मासोद्कर हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा बबलू मासोद्कर यांनी केले. सूत्रसंचालन अनुज मेटकर याने केले तर आभार प्रदर्शन कु. पायाल नंदवंशी हिने केले. महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महात्मा गांधी पुण्यतिथी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी ठीक सकाळी १०.०० वाजता महात्मा गांधी पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा पूनम केदार ह्या होत्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. अंकुश तुरखडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा दयाश्री कोकाटे यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्य दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ रोजी ठीक सकाळी ९.०० वा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गाडगे बाबांच्या जयंती निमित्य निबंध स्पर्धा व व्याखान संपन्न.**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गाडगे बाबांच्या १४८ व्या जयंती निमित्य दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी ठीक सकाळी ९.०० वा. 'गाडगे बाबांचे कार्य" या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्ध्ये मध्ये महाविद्यालायातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणत सहभाग घेतला होता. या स्पर्ध्ये मध्ये प्रथम क्रमांक कु. अश्विनी यादव, द्वितीय क्रमांक कु. प्रियंका बेठे, तृतीय क्रमांक श्रुती राऊत, चौथा क्रमांक निकिता भूसुम व पाचवा क्रमांक सचिन बामणे यांनी प्राप्त केला.

२३ फेब्रुवारी २०२४ रोजी ठीक सकाळी १०.३० वा. 'गाडगे बाबांचे कार्य" या विषयावर व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे सर होते. प्रमुखवक्ते म्हणून प्रा. डॉ. नंदकिशोर धोंडगे हे होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा शारदा निंभोरकर, प्रा प्रीती नवरे, डॉ दयाश्री कोकाटे ह्या होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा अंकुश तुरखडे ,कार्यक्रम अधिकारी रासेयो यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजत इंगोले व आभार प्रदर्शन कु. युक्ती किलेदार हिने केले. या कार्यक्रमाला महविद्यालयातील प्रा. बुराडे, डॉ. बाजपेयी, प्रा. मासोद्कर, प्रा. केदार, डॉ. वैष्णव, प्रा. पाखरे, प्रा. तुरखडे, प्रा. वानखडे, प्रा. पाखरे, प्रा. ठाकरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्राचार्य कै. एस. बी. चिंचमलातपुरे पुण्यतिथी**

दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने ठीक सकाळी ९.३० वा. प्राचार्य कै. एस. बी. चिंचमलातपुरे यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे यांनी प्राचार्य कै. एस. बी. चिंचमलातपुरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून हरार्पण केले. तसेच महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मतदान जनजागृती कार्यक्रम**

सर्वात प्रथम महाविद्यालयाच्या वेब साईट वर निवडणूक आयोगा यांनी दिलेली campaign theme व tagline याची माहिती दिली व मतदान विषयी जागृती करण्यास सुरुवात केली.

**मतदार जनजागृती कार्यशाळा**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २ मार्च २०२४ रोजी ठीक सकाळी ९.३० वाजता मतदार जनजागृती कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रवींद्र खंडेराव हे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा बबलू मासोद्कर हे होते. प्रमुख उपस्थित म्हणून प्रा अंकुश तुरखडे व डॉ दयाश्री कोकाटे हे होते. प्रा खंडेराव यांनी विद्यार्थ्यांना मतदाना विषयी जागृती करण्याचा संदेश दिला. तसेच प्रमुख वक्ते मासोद्कर यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही बळकट करण्यासाठी समाजामध्ये जागृती करण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे असे मत मांडले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रियंका ढेमरे यांनी केले . प्रास्ताविक प्रा. अंकुश तुरखडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. तर आभार प्रदर्शन सचिन बामणे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मतदाता शपथ कार्यक्रम आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ४ मार्च २०२४ रोजी ठीक सकाळी ०९.४५ वाजता मतदाता शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ एकनाथ तट्टे हे होते. सर्वात प्रा अंकुश तुरखडे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितली व त्यानंतर विद्यार्थ्यांना व सर्व प्राध्यापक यांना मतदाता शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यपक व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Selfi Point चे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ४ मार्च २०२४ रोजी ठीक सकाळी १०.४५ वाजता Selfi Point आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. अंकुश तुरखडे यांनी विद्यार्थ्यांना मतदान जागृती करण्यासाठी सेल्फी काढण्याचे महत्व समजावून सांगितले. व विद्यार्थ्यांनी या सेल्फी चा उपयोग त्यांच्या सोशल मिडिया अकाउंट करण्यास प्रेरित करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालायातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

मतदान जागृती करण्यासाठी महाविद्यालायच्या विविध ग्रुप वरती माहिती पाठविण्यात आली ज्यामध्ये मतदान करण्यास लोकांना प्रेरित करण्यास मदत झाली. महाविद्यालयातील विद्यार्थी सुद्धा या कार्यक्रमासाठी सक्रीय झाले आहेत.

**'नैसर्गिक संशाधनाचे संरक्षण व पाण्याची बचत' विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक २२ मार्च २०२४ रोजी ठीक सकाळी १०.०० वाजता दत्तक ग्राम जैतादेही येथे 'नैसर्गिक संशाधनाचे संरक्षण व पाण्याची बचत' विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले

